महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम
११२ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र कोषागार
नमुना (चलन) - ६ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. संकिर्ण १००९/प्र.क्र.३२/भाग - १/कोषा प्र-५,
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१२.

वाचा : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण १००८/प्र.क्र. ८/कोषा प्र-५, दि. ३१/१०/२००८.

**शुध्दीपत्रक :-** महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम, ११२ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र कोषागार नमुना (चलन) - ६ मध्ये उपरोक्त दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ५ (ii) नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद ५ (iii) चा अंतर्भाव करण्यात येत आहे.

**परिच्छेद ५ (iii) -** ज्या अदाकर्त्याकडे "ग्रास" प्रणालीतील सहभागी बँकेमध्ये इंटरनेट बँकींगची सुविधा असलेले खाते (Account with Net Banking facility) नाही असे अदाकर्ते "ग्रास" प्रणालीद्धारे सहभागी बँकाच्या सहाय्यने ड्राफ्ट चलन तयार करुन सदर चलनाची प्रत संबंधीत बँकेत जातील व परंपरागत पध्दतीने म्हणजे रोख / धनादेश / धनाकर्ष / पे ऑर्डर / अकाउंट ट्रान्सफरद्धारे बँकेस प्रदान करतील. संबंधीत अदाकर्त्याकडून रक्कम प्राप्त झाल्यावर बँक "ग्रास" प्रणालीद्धारे संबंधीत चलनाचा व्यवाहर पूर्ण करेल. असा व्यवहार पूर्ण झाल्यावर महाराष्ट्र कोषागार नियम ६ नमुन्यात चलन मुद्रीत होईल व प्रदानाचा पुरावा म्हणून बँकेकडून मुद्रीत झालेले चलन सही व शिक्यासह अदाकर्त्यास देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक 201209281141020700 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ. म. जाधव)
कार्यासन अधिकारी

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे व उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालय प्रमुख,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,